# ४० वा
## वार्षिक अहवाल
सन २०२१-२०२२




महाराष्ट्र शासनाचा
'सहकार भूषण'
पुरस्कार प्राप्त संस्था

।। सत्फलाय सहकारीता ।।

# शिवकृपा
## सहकारी पतपेढी लि.,मुंबई

नोंदणी क्र.: बी.ओ.एम./आर.एस.आर./एस./ १८६२ - १९८२


Website : https://shivkrupapatpedhi.com
E-mail : admin@shivkrupa.in

**प्रशासकीय कार्यालय**

शिवकृपा भवन, प्लॉट नं. आर-२२५, टि.टि.सी. इंडस्ट्रियल एरिया, एम.आय.डी.सी.,
रबाळे, नवी मुंबई ४००७०१. फोन नं.: ०२२ ६९२२ ११११

## संचालक मंडळ



**श्री. कृष्णा तु. शेलार**
संस्थापक व अध्यक्ष



**श्री. बसंत खा. चव्हाण**
उपाध्यक्ष



**श्री. चंद्रकांत श्री. वंजारी**
संस्थापक संचालक



**श्री. भिमराव दि. बोराडे**
संचालक



**श्री. पंढरीनाथ ता. भोसले**
संचालक



**श्री. जयवंत ग. खामकर**
संचालक



**श्री. अशोक ज्ञा. तुपे**
संचालक



**श्री. बबन ए. काटे**
संचालक



**श्री. शिवाजी रा. वरुडे**
संचालक



**ॲड. अशोक तु. शिंदे**
संचालक



**श्री. दिपक स. संकपाळ**
संचालक



**श्री. महेश शि. देशमुख**
संचालक



**श्री. पांडुरंग वि. घाडगे**
संचालक



**सौ. अपर्णा अ. शिंदे**
संचालिका



**सौ. वर्षा दि. कळंबे**
संचालिका



**श्री. दिपक उ. येवले**
संचालक (कर्मचारी प्रतिनिधी)



**श्री. चंद्रकांत ह. शेळके**
मुख्य कार्यकारी अधिकारी
तथा कार्यलक्षी संचालक

# शिवकृपा सहकारी पतपेढी लि., मुंबई

(नोंदणी क्र. बी.ओ.एम./आर.एस.आर./एस./१८६२-१९८२)

नोंदणीकृत कार्यालय :- २१९/३१११, टागोर नगर ग्रुप नं.१, डॉ. आंबेडकर चौक, स्टेशन रोड, विक्रोळी (पूर्व) मुंबई ४०० ०८३.

प्रशासकीय कार्यालय :- शिवकृपा भवन, प्लॉट नं. आर-२२५, टि.टि.सी. इंडस्ट्रियल एरिया, एम.आय.डी.सी. रबाळे, नवी मुंबई, ४००७०१.

## अधिमंडळाच्या चाळीसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस सन २०२१-२०२२

आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची अधिमंडळाची चाळीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार, दि. २८ ऑगस्ट २०२२** रोजी सकाळी ९.३० वाजता **विकास हायस्कूल, कन्नमवार नगर नं. ०२, विक्रोळी (पूर्व), मुंबई - ४०००८३.** येथे खालील नमूद केलेल्या विषयांच्या कामकाजासाठी आयोजित केलेली आहे. तरी आपण या सभेस वेळेवर उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

## ⁂ सभेपुढील विषय ⁂

१) दिनांक २६ सप्टेंबर २०२१ रोजी झालेल्या अधिमंडळाच्या ३९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे तसेच दिनांक २१ मार्च २०२२ रोजी झालेल्या अधिमंडळाच्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) दिनांक ३१ मार्च २०२२ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल, नफा-तोटा व ताळेबंद पत्रक यांना मंजूरी देणे.

३) सन २०२१-२२ या अहवाल सालातील नफा विभागणी व लाभांशास मंजूरी देणे.

४) सन २०२१-२२ मधील अंदाजपत्रकापेक्षा अधिक झालेल्या खर्चास मंजूरी देणे.

५) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या शासकीय लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.

६) संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची माहिती देणे व नोंद घेणे.

७) संचालक मंडळाने कर्जफेडीसाठी अक्षम ठरलेल्या सभासदांच्या कर्जावरील व्याजामध्ये अंशतःसुट दिलेल्या रकमेस मंजूरी देणे.

८) सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणाचा दोष दुरुस्ती अहवाल व त्यावरील निबंधकांच्या निर्देशांची नोंद घेवून कार्यवाही करणे.

९) सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.

१०) सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाकरीता शासकीय लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचे शुल्क ठरविणे.

११) रबाळे नवी मुंबई येथील शिवकृपा भवन या प्रशासकीय कार्यालयासाठी झालेल्या भांडवली गुंतवणूकीस कार्योत्तर मंजूरी देणे.

१२) संस्थेच्या उपविधीतील पोटनियमामध्ये संचालक मंडळाने सुचविलेल्या दुरुस्तीस मंजूरी देणे.

१३) अधिमंडळाच्या ४० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.

१४) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

आपला नम्र

**चंद्रकांत ह. शेळके**
मुख्य कार्यकारी अधिकारी तथा कार्यलक्षी संचालक,
संचालक मंडळाच्या अनुज्ञेने

स्थळ : मुंबई

दिनांक : १३ ऑगस्ट २०२२

### विशेष सुचना :

१) गणसंख्ये अभावी ही सभा तहकूब झाल्यास पोटनियमातील तरतूदीप्रमाणे सदर सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल. या सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

२) ज्या सभासदांना वार्षिक अहवाल/कामकाजासबंधी काही सूचना द्यावयाच्या असतील, अशा सभासदांनी त्या लेखी स्वरुपात संस्थेच्या प्रशासकीय कार्यालयात दिनांक २० ऑगस्ट २०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर कराव्यात. आयत्यावेळी आलेल्या सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.

# ❋ ४० वा वार्षिक अहवाल ❋

**सन्माननीय सभासद बंधू- भगिनींनो,**

आपल्या संस्थेच्या ४० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित असलेल्या आपणा सर्वांचे हार्दिक स्वागत! संचालक मंडळाच्या वतीने आपल्या संस्थेचा सन २०२१-२२ या आर्थिक वर्षातील कामगिरीचा अहवाल मी आपल्यासमोर सादर करीत आहे.

गत दोन वर्षापासून कोविड-१९ या महामारी मुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम झाला आणि त्याचा पतसंस्थांच्या कामकाजावर आणि आर्थिक व्यवहारांवर प्रतिकूल परिणाम झाला. त्यामुळे आपल्या संस्थेच्या व्यवसायावर आणि सर्वांगीण विकासावर मर्यादा आल्या.

अशा स्थितीत सभासद, ठेवीदार, ग्राहक, कर्मचारी, प्रतिनिधी यांना विश्वास, आधार व धीर देवून काम करण्याचे मोठे आव्हान संस्थेपुढे होते. हे आव्हान पेलून या आर्थिक वर्षामध्ये संस्थेने सर्व आघाडीवर उत्तम काम केले. कर्जदारांना विश्वासात घेवून वेळप्रसंगी आवश्यकते निर्णय घेऊन कर्ज वसुली करणेसाठी उत्तम यश मिळविले आहे. या सर्व प्रतिकूल परिस्थितीत संस्थेने केलेली ही कामगिरी खरोखरचं समाधानकारक आहे.

संस्थेचे सभासद ठेवीदार व ग्राहकांनी संस्थेविषयी विश्वास कायम ठेवला असून संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीत कोविड-१९ या काळात सर्व सेवकांनी/ प्रतिनिधींनी केलेले योगदान निश्चितच कष्टपूर्ण असे आहे. हे आपणासमोर सादर केलेला अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक यावर दिसून येईल.

## ❋ विशेष उल्लेखनीय बाबी ❋

### ▶ शिवकृपा भवन उद्घाटन सोहळा :-

संस्थेचा वाढता शाखा विस्तार व व्यवसायाचा वाढता व्याप लक्षात घेवून संस्थेने प्रशासकीय कार्यालयासाठी रबाळे, नवी मुंबई येथे स्वतःच्या मालकीची जागा खरेदी केलेली आहे. या जागेवर प्रशस्त व सुसज्ज ०६ मजली शिवकृपा भवन इमारतीचे बांधकाम पुर्णत्वास जावून या इमारतीचा उद्घाटन सोहळा सोमवार दिनांक १४ फेब्रुवारी २०२२ रोजी मा. केंद्रीय मंत्री व खासदार श्री. शरदचंद्रजी पवार साहेब यांचे शुभहस्ते संपन्न झाले. याप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री, ना. श्री. बाळासाहेब पाटील,आमदार श्री. शशिकांत शिंदे, नवी मुंबई महानगरपालिकचे मा.विरोधी पक्षनेते, श्री. विजय चौगुले तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष श्री. काका कोयटे उपस्थित होते.

### ▶ ३९३७ कोटी व्यवसायाची संकल्पपूर्ती

संस्थेने ग्राहकांना दिलेली दर्जेदार सेवा, ग्राहकांशी जपलेला ऋणानुबंध आणि सभासद, ठेवीदार व हितचिंतक यांनी संस्थेप्रती दाखविलेला विश्वास यामुळे ३१ मार्च २०२२ अखेर ₹३,९३७ कोटी संमिश्र व्यवसायाचा टप्पा पूर्ण केलेला आहे. ही बाब संस्थेच्या व आपणा सर्वांच्या दृष्टीने अभिनंदनीय व अभिमानास्पद आहे.

### ▶ शाखा विस्तार :-

अहवाल सालात एक प्रशासकीय कार्यालय, सात विभागीय कार्यालये व एकूण १०० शाखा कार्यालये आहेत. संस्थेच्या उपरोक्त एकूण १०८ कार्यालयांपैकी ४२ कार्यालये स्वतःच्या मालकीच्या जागेत कार्यरत आहेत. संस्थेची अधिकाअधिक शाखा कार्यालये स्वतःच्या मालकीची असावीत यासाठी संचालक मंडळ सदैव प्रयत्नशील आहे.

### ▶ संचालक मंडळ :-

संस्थेमध्ये एकूण १५ संचालक, एक संचालक कर्मचारी प्रतिनिधी आणि एक मुख्य कार्यकारी अधिकारी तथा कार्यलक्षी संचालक असे एकूण १७ संचालक कार्यरत आहेत.

अहवाल सालात संस्थेच्या संचालक मंडळाच्या एकूण ५३ साप्ताहिक सभा घेण्यात आल्या. सर्व सभांना बहुसंख्येने संचालक उपस्थित होते. संस्थेचे सर्व संचालक सदस्य सभासद, ग्राहक व कर्मचारी वर्गास सदैव मार्गदर्शन करतात व संस्थेच्या कामकाजात सहभागी होऊन कामकाजात गतिमान राखण्याचा प्रयत्न करतात.

संस्थेतील विविध विभागांचे कामकाज जलद गतीने व सुलभतेने होण्यासाठी संचालक मंडळा अंतर्गत असलेल्या कर्ज वितरण, कर्ज वसुली, नियोजन व विकास आणि लेखापरिक्षण या चार समित्यांच्या सभा वेळोवेळी आयोजित केल्या जातात. या समित्यांच्या सभांनाही समिती सदस्यांची शासनाचे नियमानुसार कोविड १९ चे नियम पाळून उपस्थिती समाधानकारक राहिलेली आहे. तसेच वेळोवेळी संस्थेचे संचालक मंडळ, प्रशासकीय अधिकारी व शाखाधिकारी यांच्या संयुक्तरित्या Performance Review Meeting घेण्यात येत असून सदर सभांद्वारे उद्दिष्टपूर्तीचा आढावा घेण्यात येतो आणि आवश्यक तेथे मार्गदर्शन करण्यात येते. संचालक मंडळाने संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी वेगवेगळे उपक्रम राबवून एकसंघपणे व आत्मीयतेने काम केल्यामुळेच आपल्या संस्थेची प्रगतीच्या दिशेने सतत वाटचाल सुरु आहे.

## मान्यवरांच्या भेटी :

अहवाल सालात संस्थेच्या प्रशासकीय कार्यालयासह विविध शाखा कार्यालयांना, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सहकार क्षेत्रातील मान्यवर, शासकीय अधिकारी तसेच संत महंतांनी सदिच्छा भेटी दिल्या. याप्रसंगी त्यांनी संस्थेच्या कामकाजाची पाहणी करुन माहिती घेतली त्याचप्रमाणे संस्थेच्या कामकाजाचे आणि प्रगतीचे कौतुक करुन शुभेच्छा दिल्या. दि. ११ मार्च २०२२ रोजी श्री. अनिल कवडे, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे, तसेच श्री. शैलेश कोतमिरे, अप्पर निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे, यांनी संस्थेच्या रबाळे, नवी मुंबई येथील नवीन प्रशासकीय कार्यालयास सदिच्छा भेट देवून मार्गदर्शन केले, याप्रसंगी श्री. आप्पाराव घोलकर, विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था कोकण विभाग, श्री. राम शिर्के, विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था,लेखापरिक्षण, मुंबई विभाग, श्री. किरण सोनवणे, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ठाणे हे उपस्थित होते.

## सामाजिक बांधीलकी :

सहकार क्षेत्रात काम करीत असताना सामाजिक बांधीलकी जपणे शिवकृपाने आपले आद्य कर्तव्य समजले आहे. अहवाल वर्षात विविध क्षेत्रामध्ये सामाजिक काम करणाऱ्या विश्वस्त संस्थांना आर्थिक मदत करुन सामाजिक कार्यास हातभार लावलेला आहे. व सामजिक कार्याच्या माध्यमातून समाजाला दिशा देण्याचे व जनजागृती करण्याचे काम संस्थेने केलेले आहे.

## प्रशिक्षण :-

सेवक प्रशिक्षण हा खर्च नसून ती भविष्यातील फायदेशीर गुंतवणूक आहे. हा विचार आपल्या संस्थेने स्विकारला आहे. प्रशिक्षण हा उपक्रम अधिक व्यापक व दर्जेदार व्हावा म्हणून विविध क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींना प्रशिक्षण देण्यासाठी निमंत्रीत करण्यात येते. संस्थेच्या कर्मचाऱ्यांची गुणवत्ता वाढावी यासाठी बँकींग या विषयांवर ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले होते. या प्रशिक्षण शिबीरांमध्ये संस्थेच्या सर्व कर्मचारी यांना कर्ज वितरण, कर्जवसूली, दस्तऐवज / कागदपत्रे पुर्तता व महत्व, एम.आय.एस. प्रणाली व विपणन, व्यक्तिमत्व विकास,संगणक तसेच कोअर बँकिंग या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

## चिंतन व प्रशिक्षण शिबीर :-

संस्थेचे मा. पदाधिकारी, संचालक व अधिकारी यांचे दिनांक २०,२१ व २२ ऑक्टोंबर २०२१ या कालावधी मध्ये मंत्रा रिसॉर्ट, भोर, जि. पुणे येथे संयुक्त चिंतन शिबीर घेण्यात आले. यामध्ये संस्थेच्या अर्धवार्षिक कामकाजाची पूर्ती व पुढील संकल्पपूर्तीचे नियोजन आणि ध्येय धोरण यावर शाखानिहाय चर्चा करण्यात आली या प्रसंगी उद्घाटक म्हणून वाई खंडाळा, महाबळेश्वर तालुक्याचे आमदार श्री. मकरंद (आबा) पाटील उपस्थित होते. त्यांनी संस्थेच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त करुन कौतुक केले. तसेच या चिंतन शिबीरा प्रसंगी डॉ.पी.एल. खंडागळे, अप्पर निबंधक (पतसंस्था) सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी उपस्थिती देवून सर्व पदाधिकारी, संचालक व अधिकारी यांना मार्गदर्शन केले.

## स्नेहसंवर्धन :-

सभासद हा संस्थेचा मुलभूत घटक आहे तर संचालक, ठेवीदार, ग्राहक, कर्मचारी व प्रतिनिधी हे संस्थेचे पोषक घटक आहेत. या सर्वांच्या डोळस वृत्तीमुळे संस्थेचा कारभार पारदर्शक होण्यास मदत होते. या सर्वांनी केलेल्या सहकार्यामुळेच संस्थेची प्रगतीच्या दिशेने वाटचाल सुरु आहे. या सर्वांच्या मध्ये सुसंवाद व समन्वय साधून स्नेह वृध्दिगंत करण्यासाठी संस्थेच्या सर्व शाखांमध्ये अहवाल सालामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन केले होते. यामध्ये दिनांक २२ नोव्हेंबर २०२१ रोजी संस्थेच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून सभासद, ठेवीदार, खातेदार व हितचिंतक 'स्नेहसंवर्धन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

तर दि. ०८ मार्च २०२२ रोजी संस्थेमध्ये ''महिला दिन'' आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमास संस्थेच्या सर्व शाखांमध्ये ३७५० पेक्षा अधिक महिला उपस्थित होत्या. या उपक्रमाद्वारे संस्थेच्या कामकाजाबाबत सभासद व ग्राहक यांच्या सुचना व संकल्पना समजून घेणे शक्य झाले. परिणामी त्यानुसार कामकाजामध्ये सुधारणा करण्यात आली. वर्धापन दिनादिवशी संस्थेचा संमिश्र व्यवसाय एका दिवशी रक्कम ₹ ५९.५५ कोटी एवढा झाला आहे. तर महिला दिनादिवशी संस्थेचा संमिश्र व्यवसाय रक्कम ₹ ५०.३२ कोटी एवढा झालेला आहे. हा व्यवसाय पुर्ण करण्यासाठी सर्व सभासद, ठेवीदार तसेच महिला खातेदार, सभासद यांचे मोलाचे सहकार्य लाभले. असे विविध उपक्रम राबविण्याचा संस्थेच्या संचालक मंडळाचा मनोदय आहे.

## कर्मचारी :-

संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून श्री. चंद्रकांत ह. शेळके, (निवृत्त मुख्य अधिकारी, जनता सहकारी बँक लि. पुणे) काम करीत आहेत.

संस्थेच्या शाखांची मुंबई-१, मुंबई-२, ठाणे, सातारा, कोरेगांव, पुणे व सोलापूर या सात विभागांमध्ये विभागणी केली आहे. या सातही विभागांसाठी स्वतंत्र विभागीय अधिकारी, विभागीय कर्जवितरण अधिकारी व विभागीय कर्ज वसुली अधिकारी तसेच शाखा अंतर्गत तपासणी अधिकारी यांची नेमणूक केली आहे.

अहवाल सालात संस्थेच्या सेवेत १ मुख्य कार्यकारी अधिकारी, ९ प्रशासकीय अधिकारी/ विभाग प्रमुख, ७ विभागीय अधिकारी, ७ विभागीय कर्ज वितरण अधिकारी, ७ कर्ज वसुली अधिकारी, १०० शाखाधिकारी, ४३ अधिकारी, ६१७ लिपीक, १३ शिपाई व ०१ वाहन चालक असे एकूण ८०५ कर्मचारी आपले काम कर्तव्य भावनेने पार पाडीत आहेत.

## ठेव संकलन प्रतिनिधी :-

अहवाल सालात संस्थेमध्ये ९०२ दैनंदिन ठेव संकलन प्रतिनिधी व ६४ शिवसागर ठेव संकलन प्रतिनिधी काम करीत असून संस्थेमध्ये एकूण ९६६ ठेव संकलन प्रतिनिधी कार्यरत आहेत. संस्थेच्या ठेवी वाढविण्यामध्ये त्यांनी मोलाचे योगदान दिलेले आहे.

## संगणकीकरण /कोअर बँकींग :-

नव तंत्रज्ञानाचे वाढते महत्व लक्षात घेऊन आपली संस्था गेली २६ वर्षे ग्राहकांना संगणकाद्वारे सेवा देत आहे. त्यामुळे संस्थेच्या खातेदारांना तत्पर, अचूक व अद्ययावत माहिती उपलब्ध होत आहे. परिणामी, ग्राहकांचा संस्थेवरील विश्वास वृध्दिंगत झाला आहे. रिझर्व्ह बँकेने कोअर बँकींग ही प्रणाली सर्व बँकाना बंधनकारक केलेली आहे. त्याबाबत पतसंस्थांना अजून असे कोणतेही बंधन नसताना आपल्या संस्थेने सभासद, ग्राहक, ठेवीदार यांना तत्पर व अचूक सेवा देता यावी. संस्थेच्या सेवेचा दर्जा सुधारावा याकरीता कोअर बँकींग प्रणालीचा अवलंब केलेला आहे संस्थेच्या सर्व शाखा कोअर बँकींग प्रणालीव्दारे जोडण्यात आलेल्या आहेत.

त्याचप्रमाणे ठेव संकलन प्रतिनिधीव्दारे करण्यात येणाऱ्या ठेवीच्या संकलनासाठी संस्थेने एजन्सी बँकींग मोबाईल ॲप विकसीत केले असून त्याव्दारे ग्राहकांकडून ठेवीचे संकलन करण्यात येत आहे. त्यामुळे ग्राहकांना त्वरीत ऑनलाईन सेवा मिळत आहे. तसेच ग्राहकांना वीज बिल कलेक्शन सुविधा, विमा सेवा, बी.बी.पी.एस (भारत बिल पेमेंट सर्व्हिस) व्दारे वेगवेगळ्या पेमेंट करण्याच्या सुविधा संस्थेने सुरु केल्या आहेत. यामुळे संस्थेच्या कामकाजामध्ये अचुकता व गतीमानता आली आहे.

संस्थेने आपल्या ग्राहकांना घरबसल्या बँकींग सेवांचा लाभ घेण्यासाठी 'शिवम पे' या मोबाईल ॲप चे उद्घाटन संस्थेच्या रबाळे, नवी मुंबई. येथील नुतन प्रशासकीय कार्यालयाच्या उद्घाटन समारंभा दिवशी म्हणजेच सोमवार, दिनांक १४ फेब्रुवारी २०२२ रोजी राज्याचे सहकार मंत्री मा.ना. श्री. बाळासाहेब पाटील यांच्या शुभ हस्ते केलेले आहे. या ॲपद्वारे ग्राहकांना खात्यातील शिल्लक रक्कम तपासणे, खात्यातील रक्कम इतर बँकांच्या खात्यावर वर्ग करणे तसेच (**IMPS / NEFT/RTGS** ) या सुविधा देवू केल्या आहेत.

## संस्थेने अहवाल सालात केलेल्या दैदिप्यमान प्रगतीचा संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल पुढीलप्रमाणे

### १) सभासद :-

अहवाल सालाच्या सुरुवातीस एकूण ३,२१,९७८ सभासद होते. त्यामध्ये ४६,४४४ नवीन सभासदांची वाढ झाली. राजीनामे दिलेल्या व सभासदत्व संपुष्टात आलेल्या एकूण ५१६४ सभासदांची संख्या कमी झाल्यामुळे वर्ष अखेरीस संस्थेचे एकूण ३,६३,२५८ सभासद आहेत.

### २) भाग भांडवल :-

आपल्या संस्थेचे अधिकृत भाग भांडवल ₹ २५० कोटी असून, अहवाल सालाच्या सुरुवातीस ₹ १३३.७२ कोटी एवढे वसुल भाग भांडवल होते. अहवाल सालात नवीन सभासद व कर्जदार सभासदांकडून कर्ज वाटपाच्या प्रमाणात जादा भाग भांडवल वसुल झाल्याने ₹ ४.३७ कोटीने वाढ होऊन वर्ष अखेरीस संस्थेकडे एकूण वसुल भाग भांडवल रक्कम ₹ १३८.०९ कोटी झालेले आहे.

### ३) निधी :-

#### अ) गंगाजळी (राखीव निधी) :-

अहवाल सालाच्या सुरुवातीस गंगाजळीमध्ये ₹ ४६.७० कोटी जमा होते. अहवाल सालात जमा झालेली प्रवेश फी व सन २०१७-२०१८ सालाचा लाभांश सभासदांनी घेऊन न गेल्यामुळे सहकार कायद्यानुसार तो गंगाजळी मध्ये वर्ग करण्यात आलेला असून अहवाल सालाच्या अखेरीस एकूण रक्कम ₹ ५३.३२ कोटी गंगाजळी मध्ये जमा आहेत.

#### ब) इमारत निधी :-

अहवाल सालाच्या सुरुवातीस इमारत निधीमध्ये ₹ ६९.९२ कोटी जमा होते. अहवाल सालामध्ये रक्कम ₹ ६.४० कोटींची वाढ झाल्याने वर्ष अखेरीस एकूण रक्कम ₹ ७६.३२ कोटी इमारत निधी मध्ये जमा आहेत.

#### क) अन्य निधी :-

अहवाल सालाच्या सुरुवातीस अन्य निधी मध्ये ₹ १४८.८० कोटी जमा होते. अहवाल सालामध्ये ₹ ६.२३ कोटीने वाढ झाल्याने वर्ष अखेरीस एकूण ₹ १५५.०३ कोटी अन्य निधीमध्ये जमा आहेत.

### ४) गुंतवणूक :-

आपले उत्पन्न व नफा वाढविण्याच्या दृष्टीने संस्थेकडे उपलब्ध असलेल्या निधीचे योग्य नियोजन करुन गुंतवणूक करणे कामी संस्थेने विशेष लक्ष दिले आहे. कमीत कमी जोखीम व चांगली तरलता आणि सुयोग्य परतावा या मुख्य निकषांवर आधारित गुंतवणूकीचे निर्णय घेतले आहेत. तसेच **C.R.R.** व **S.L.R.** चे विहीत प्रमाण राखले आहे. अहवाल सालाच्या सुरुवातीस अतिरिक्त व राखीव निधीची मुदत ठेवीपोटी विविध बँकामध्ये एकूण रक्कम ₹ ६५७.७५ कोटी गुंतवणूक केलेली होती. बँकांचे मुदत ठेवींचे कमी होणारे व्याजदर लक्षात घेऊन उत्पन्न वाढीच्या दृष्टीने संस्थेने आर्थिक वर्षामध्ये शासकीय रोख्यांमध्ये गुंतवणूक केली आहे. माहे मार्च २०२२ अखेर संस्थेची एकूण गुंतवणूक रक्कम ₹ ८४०.९३ कोटी एवढी आहे.

## -: प्रगती दर्शक तक्ता :-

(₹ कोटीत)

| अ. क्र. | तपशील | सन | | | सन | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | वाढ/घट | टक्के |
| १ | सभासद (संख्या) | २,३९,८६२ | २,८८,५२० | ३,२१,९७८ | ३,६३,२५८ | ४१,२८० | १२.८२ |
| २ | भाग भांडवल | १२३.०३ | १३३.५४ | १३३.७२ | १३८.०९ | ४.३७ | ३.२७ |
| ३ | निधी | | | | | | |
| | अ) राखीव निधी | ३२.०० | ४०.१२ | ४६.७० | ५३.३२ | ६.६२ | १४.१८ |
| | ब) इमारत निधी | ५५.५८ | ६३.४९ | ६९.९२ | ७६.३२ | ६.४० | ९.१५ |
| | क) अन्य निधी | १०२.९५ | १२०.४८ | १४८.८० | १५५.०३ | ६.२३ | ४.१९ |
| ४ | गुंतवणूक | ७४८.२३ | ७५३.४३ | ६५७.७५ | ८४०.९३ | १८३.१८ | २७.८५ |

### ५) ठेवी :-

संस्थेच्या प्रगतीची घोडदौड कायम ठेवण्यासाठी संस्थेने वेगवेगळे उपक्रम आयोजित केलेले होते. तसेच संस्थेच्या विविध ठेव योजनांचा नियमितपणे आढावा घेण्यात आला व त्यात काळानुरुप वेळोवेळी व्याजदरात आवश्यक ते बदल करण्यात आले.

अहवाल सालाच्या सुरुवातीस संस्थेच्या विविध ठेवींमध्ये ₹ २०११.१९ कोटी जमा होते. अहवाल सालात ठेवींमध्ये ₹ २०७.५९ कोटीने वाढ झाल्यामुळे वर्ष अखेरीस संस्थेच्या विविध ठेवीमध्ये ₹ २२१८.७८ कोटी जमा आहेत. गतवर्षीच्या तुलनेत अहवाल सालामध्ये ठेवींमध्ये ₹२०७.५९ कोटींनी वाढ झालेली आहे. त्याचे शेकडा प्रमाण १०.३२% आहे.

### ६) कर्जे :-

कर्जव्यवहार हा संस्थेच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत आहे. त्याअनुषंगाने बदलत्या काळानुसार व ग्राहकांच्या गरजा लक्षात घेवून संस्थेने विविध कर्ज योजना तयार केलेल्या आहेत. या योजनांचा लाभ बहुसंख्य सभासदांनी घेतला आहे.

अहवाल सालाच्या सुरुवातीस ₹ १६८८.१७ कोटी कर्ज येणे बाकी होते. अहवाल सालामध्ये संस्थेने सभासदांना ₹ ६६८.५० कोटी नव्याने कर्ज वाटप केले असून ₹ ६३८.७२ कोटी कर्ज वसुल झालेले आहे. वर्ष अखेरीस एकूण ₹ १७१७.९५ कोटी कर्ज येणे बाकी आहे. गतवर्षीच्या तुलनेत अहवाल सालामध्ये रक्कम ₹ २९.७८ कोटींनी वाढ झाली आहे.त्याचे शेकडा प्रमाण १.७६% आहे.

### ७) कर्ज थकबाकी व वसुली :-

मा. सहकार आयुक्त व निबंधक, यांनी सन २००५-०६ पासून अनुत्पादक कर्जाचे **(N.P.A.)** निकष पतसंस्थांसाठी लागू केले आहेत. त्यामुळे संस्थेचा वसुली विभाग अनुत्पादक कर्जे कमी करण्यासाठी सतत पाठपुरावा करीत आहे. त्याचप्रमाणे संस्थेचे संचालक मंडळ व वसुली समिती वेळोवेळी कर्ज वसुलीची मोहिम राबवित आहे. संस्थेचे संचालक मंडळ, कर्ज वसुली समिती, वसुली अधिकारी आणि कर्मचारी सातत्याने थकीत कर्जदार व त्यांच्या जामीनदारांशी संपर्क साधून कर्ज थकबाकीचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

मार्च २०२२ अखेर येणे कर्जाशी थकीत कर्जाचे शेकडा प्रमाण १०.८२% आहे.

## ८) एन. पी. ए. :-

सहकार खात्याने प्रसारीत केलेल्या एन.पी.ए. च्या निकषानुसार दि. ३१ मार्च २०२२ अखेर येणे कर्जाशी निव्वळ एन.पी.ए.चे शे. प्रमाण १३.९८% आहे.

सहकार खात्याने प्रसारीत केलेल्या एन. पी. ए. च्या निकषानुसार एन. पी. ए. पोटी रक्कम ₹ ५४.७२ कोटी तरतूद करणे आवश्यक होते. मात्र ही तरतूद आपल्या संस्थेने रक्कम ₹ ७९.०२ कोटी केलेली आहे. आवश्यक तरतूदीपेक्षा रक्कम ₹ २४.३० कोटी अधिक तरतूद केली आहे.

## ९) संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेली कर्जे :-

अहवाल वर्षामध्ये संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेली कर्जे व वसुली याचा तपशिल पुढीलप्रमाणे.

(₹ लाखांत)

| अ. क्र. | तपशील | ३१-०३-२१ | २०२१-२२ | | | | ३१-०३-२२ अखेर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अखेर येणे कर्ज | दिलेले कर्ज | एकूण वसुल कर्ज | अखेर येणे कर्ज | थकीत रक्कम | थकबाकीचे शे.प्रमाण |
| १ | संचालक | २५.६२ | - | २५.६२ | - | - | - |
| २ | नातेवाईक | १६३.८१ | - | ७१.२६ | ९२.५५ | - | - |
| | **एकूण** | **१८९.४३** | - | **९६.८८** | **९२.५५** | - | - |

## १०) नफा विभागणी :-

अहवाल साली एकूण खर्च वजा जाता ₹ २०,४३,९३,१६६.७३ नफा झालेला असून गतवर्षीचा शिल्लक नफा ₹ १,१५१.०० मिळून एकूण नफा रक्कम ₹ २०,४३,९४,३१७.७३ आहे. सदर नफ्याची विभागणी पुढीलप्रमाणे करण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे. त्यास आपण मंजूरी द्यावी ही विनंती.

| | | | |
|---|---|---|---|
| गंगाजळी २५ % | : | ₹ | ५,११,००,०००.०० |
| थकीत व्याज तरतूद (नि.म.परिपत्रक क्रमांक ८१५ दि.१७.०३.२०२२ नुसार) | : | ₹ | २,९५,००,०००.०० |
| लाभांश ९.००% | : | ₹ | ११,८१,३३,७४७.०० |
| संशयीत बुडीत कर्जनिधी | : | ₹ | ३०,००,०००.०० |
| सहकार प्रशिक्षण निधी | : | ₹ | ५,००,०००.०० |
| कर्मचारी कल्याण निधी | : | ₹ | ५,००,०००.०० |
| समाज कल्याण निधी | : | ₹ | ५,००,०००.०० |
| व्यवसाय वृध्दी निधी | : | ₹ | ११,५९,२६९.७३ |
| पुढील वर्षासाठी शिल्लक | : | ₹ | १,३०१.००० |
| **एकूण...** | : | ₹ | **२०,४३,९४,३१७.७३** |

## ११) हिशोब तपासणी :-

### अ) अंतर्गत हिशोब तपासणी :-

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाची अंतर्गत हिशोब तपासणी अभिजीत शिंदे ॲण्ड कंपनी, अंबावत जैन ॲण्ड असोसिएटस, एम. एस. बी. एस. ॲण्ड कंपनी यासह इतर सर्व कार्यरत समवर्ती लेखापरिक्षक यांनी केलेले असून त्यांनी संस्थेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले आहे.

### ब) शासकीय लेखापरिक्षण :-

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे शासकीय लेखापरिक्षण सनदी लेखापाल मे. आर. आर. पिंगळे ॲण्ड कंपनी चार्टर्ड अकौंटंट यांनी केले आहे. त्यांनी संस्थेस लेखापरिक्षण वर्ग 'अ' दिलेला असून संस्थेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले आहे.

## १२) श्रध्दांजली :-

अहवाल सालात संस्थेचे जे सभासद, ठेवीदार, हितचिंतक तसेच राष्ट्रीय किर्तीच्या ज्या थोर विभूती पंचतत्वात विलीन झाल्या त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभावी यासाठी शिवकृपा परिवाराच्यावतीने ईश्वरचरणी प्रार्थना!

## १३) आभार :-

संस्थेचे सन्माननीय सभासद, ग्राहक आणि खातेदार यांनी संस्थेच्या कामकाजात केलेल्या सक्रिय सहकार्यामुळेच संस्थेला प्रगतीची वाटचाल करणे शक्य झाले आहे. अशा सर्व व्यक्तींचा संचालक मंडळाच्यावतीने मी प्रथमतः आभारी आहे.

संस्थेला वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य करणारे महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सहकार मंत्री व विविध खात्यांचे मंत्री यांचे मनस्वी आभार!

महाराष्ट्राचे मा. सहकार सचिव, सहकार आयुक्त व निबंधक, अप्पर निबंधक तसेच राज्यातील सर्व विभागीय सहनिबंधक, जिल्हा उपनिबंधक, सहाय्यक निबंधक त्याचप्रमाणे सहकार खात्याचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचेही आभार!

महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन बरोबरच राज्यातील सर्व जिल्हयातील सहकारी पतसंस्था फेडरेशनचे पदाधिकारी व संचालक यांचे मनःपूर्वक आभार !

मुंबई सहकारी बोर्ड त्याचप्रमाणे राज्याच्या सर्व जिल्हयातील सहकारी बोर्डाचे पदाधिकारी व संचालक यांचे मनःपूर्वक आभार! संस्थेचे शासकीय लेखापरिक्षक मे. आर. आर. पिंगळे ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौटंट, अंतर्गत लेखापरिक्षक एस.व्हि.ए.बी. ॲण्ड असोसिएटस, अंबावत जैन ॲण्ड असोसिएटस, एम. एस. बी. एस. ॲण्ड कंपनी, गुरसाळे ॲण्ड कंपनी यासह सर्व कॉन्करंट ऑडीट टिम त्याचबरोबर संस्थेचे सर्व कायदेविषयक सल्लागार, स्थावर मालमत्ता आणि सुवर्ण मुल्यांकनकार या सर्वांनी संस्थेच्या प्रगतीसाठी सखोल मार्गदर्शन केले आहे. त्याबद्दल या सर्वांचे मनपूर्वक आभार !

संस्थेचे कर्मचारी व ठेव संकलन प्रतिनिधी यांनी समर्पित भावनेने दिलेल्या ग्राहक सेवेमुळेच संस्था प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. यांचे संचालक मंडळ कौतुकपुर्ण उल्लेख करु इच्छिते. टिमवर्कच्या भावनेतून कार्यरत राहिले तरच स्वप्नवत कार्य देखील सिध्दीस जाते. या उक्तीनुसार संस्थेचे कामकाज सुरु आहे आणि यापुढेही संस्थेची अशीच प्रगतीच्या दिशेने वाटचाल सुरु राहील. तसेच आपल्या सामर्थ्याच्या व एकीच्या बळावर आपल्या दैदिप्यमान प्रगतीचा आलेख असाचा उंचावत ठेवू. संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीमध्ये सर्व आजी-माजी संचालकांच्या बहुमुल्य मार्गदर्शनाचा, सहकार्याचा आणि पाठिंब्याचा मोठा सहभाग आहे. त्याबद्दल त्यांचेही मनःपूर्वक आभार !

आपण देत असलेल्या सततच्या पाठिंब्यामुळे पुढील आर्थिक वर्ष पुन्हा एकदा सर्वांगीण प्रगतीचे असेल अशी संचालक मंडळाच्या वतीने ग्वाही देवून आपले सहकार्य असेच उत्तरोत्तर वृध्दिंगत व्हावे अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो.

पुन्हा एकदा सर्व सभासद बंधु भगिनींचे आभार मानून अहवाल पूर्ण करीत आहे. धन्यवाद !

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**

**श्री. कृष्णा तु. शेलार**
संस्थापक व अध्यक्ष

# -: परिशिष्ट "अ" :-

| | | |
|---|---|---|
| **संस्थेचे नाव** | : | शिवकृपा सहकारी पतपेढी लि., मुंबई |
| **प्रशासकीय कार्यालय** | : | शिवकृपा भवन, प्लॉट नं. आर. २२५, टि.टि.सी. इंडस्ट्रियल एरिया, एम.आय.डि.सी. रबाळे, नवी मुंबई, ४००७०१. |
| **नोंदणी क्रमांक** | : | बी.ओ.एम/आर.एस.आर./एस/१८६२-१९८२ |
| **कार्यक्षेत्र** | : | संपूर्ण महाराष्ट्र राज्य |
| **शाखा** | : | प्रशासकीय कार्यालय, ७ विभागीय कार्यालये व १०० शाखा |
| **सभासद संख्या** | : | ३,६३,२५८ |
| **अधिकृत भाग भांडवल** | : | ₹ २५०.०० कोटी |
| **वसुल भाग भांडवल** | : | ₹ १३८.०९ कोटी |
| **राखीव निधी व इतर निधी** | : | ₹ २८४.६८ कोटी |
| **ठेवी** | : | ₹ २२१८.७८ कोटी |
| **कर्जे** | : | ₹ १७१७.९५ कोटी |
| **गुंतवणूक** | : | ₹ ८४०.९३ कोटी |
| **खेळते भांडवल** | : | ₹ २७००.६० कोटी |
| **निव्वळ नफा** | : | ₹ २०.४४ कोटी |
| **बाहेरील कर्जे** | : | निरंक |
| **लाभांश** | : | ९% |
| **लेखापरिक्षण वर्ग** | : | 'अ' वर्ग |
| **थकबाकी प्रमाण** | : | १०.८२% |
| **सी. डी. रेशो** | : | ६९.२५% |
| **एकूण कर्मचारी** | : | ८०५ |
| **संमिश्र व्यवसाय** | : | ₹ ३९३६.७३ कोटी |

## दि. ३१ मार्च २०२२ अखेरचे

| 31-03-2021 ₹ पै. | EXPENDITURE / खर्च | ₹ पै. | 31-03-2022 ₹ पै. |
|---|---|---|---|
| 136,82,95,015.51 | **INTEREST ON DEPOSIT / ठेवीवरील व्याज** | | 141,49,42,072.53 |
| | **INTEREST ON BORROWING / घेतलेल्या कर्जावरील व्याज** | | |
| 5,96,656.00 | 1. LOAN AGAINST FIXED DEPOSIT / ठेवतारण कर्जावरील व्याज | | 2,68,885.00 |
| | **SALARY & ALLOWANCE / पगार व भत्ते** | | |
| 28,61,45,072.00 | 1. STAFF SALARY / कर्मचारी पगार | 31,89,52,116.00 | |
| 2,22,75,135.00 | 2. EMPLOYER P.F.CONT. / संस्थेचे अंशदान भ.नि.निधी | 2,43,00,109.00 | |
| 9,39,952.00 | 3. P.F ADMINE EXP./ भ.नि.वरील प्रशासकीय खर्च | 9,86,152.00 | |
| 1,49,96,617.00 | 4. BONUS PAYABLE / बोनस देय | 0.00 | |
| 1,10,81,194.00 | 5. GRATUITY & LEAVE ENCASHMENT / ग्रॅच्युईटी व रजा रोखीकरण | 2,37,17,990.00 | |
| 58,08,661.66 | 6. CONTRACTUAL & OUTSOURCING EXP./ (कंत्राटी करार व आउटसोर्सिंग खर्च) | 56,31,049.92 | 37,35,87,416.92 |
| 20,95,250.33 | **PRINTING & STATIONERY / छपाई व स्टेशनरी** | | |
| 70,75,933.59 | PRINTING & STATIONERY / छपाई व स्टेशनरी | 79,82,941.91 | |
| 49,80,683.26 | LESS STOCK OF STATIONERY / वजा छपाई साठा | 51,98,223.45 | 27,84,718.46 |
| | **ADMINISTRATIVE EXPENSES / प्रशासकीय खर्च** | | |
| 12,19,014.00 | 1. CONVEYANCE / प्रवास | 23,38,042.00 | |
| 1,96,692.04 | 2. ADVERTISEMENT / जाहिरात | 5,07,715.78 | |
| 15,59,367.00 | 3. POSTAGE / टपाल | 25,55,010.01 | |
| 9,45,52,425.36 | 4. AGENT COMMISSION / प्रतिनिधी कमिशन | 14,06,17,305.55 | |
| 1,47,87,303.00 | 5. OFFICE RENT / कार्यालयीन भाडे | 1,62,91,783.00 | |
| 92,00,654.00 | 6. ELECTRICITY / विद्युत | 1,19,97,848.00 | |
| 37,91,092.46 | 7. TELEPHONE / टेलिफोन | 42,79,310.05 | |
| 62,67,700.00 | 8. INSURANCE EXP. / विमा | 79,92,315.40 | |
| 32,54,000.00 | 9. AUDIT FEES / ऑडिट फी | 34,24,500.00 | |
| 30,52,244.20 | 10. TAXES / कर | 43,84,631.02 | 19,43,88,460.81 |
| | **OTHER EXPENSES / इतर खर्च** | | |
| 2,09,18,836.24 | 1. OFFICE REPAIRS & MAINTENANCE /कार्या. देखभाल व दुरुस्ती | 2,29,53,056.38 | |
| 1,800.00 | 2. NEWSPAPER / वर्तमानपत्र | 3,265.00 | |
| 9,00,538.00 | 3. XEROX / झेरॉक्स | 10,56,703.00 | |
| 4,68,807.00 | 4. POOJA / पूजा | 6,43,377.20 | |
| 4,35,602.00 | 5. INAUGRATION & FUNCTION / उद्घाटन व समारंभ | 31,19,606.45 | |
| 45,97,617.30 | 6. MISC. EXPS. / किरकोळ खर्च | 78,49,205.55 | |
| 17,72,600.00 | 7. PROFESSIONAL FEE / व्यावसायिक फी | 11,55,166.92 | |
| 2,38,687.53 | 8. LOCKERS RENT / लॉकर्स भाडे | 2,88,235.67 | |
| 2,13,002.00 | 9. TRAINING / प्रशिक्षण | 11,38,804.48 | |
| 3,80,211.00 | 10. WATER / पाणी | 7,13,240.00 | |
| 188,00,41,746.63 | BALACE C/F / पुढील पानावर ..... | | 198,59,71,553.72 |

## नफा-तोटा पत्रक

| 31-03-2021 ₹ पै. | INCOME / उत्पन्न | ₹ पै. | 31-03-2022 ₹ पै. |
|---|---|---|---|
| | **INTEREST RECEIVED / मिळालेले व्याज** | | |
| 200,50,98,514.93 | 1. ON LOAN / कर्जावरील | 194,96,03,412.38 | |
| 43,15,00,535.00 | 2. ON BANK DEPOSIT / बँक ठेवीवरील | 37,18,41,699.91 | |
| 38,897.41 | 3. ON LIQUID FUND / लिक्वीड फंड | 12,58,285.56 | |
| 7,81,733.00 | 4. ON MSEDCL DEPOSIT / एम.एस.ई.डी.सी.एल. ठेवीवरील | 3,20,850.00 | 232,30,24,247.85 |
| | **OTHER INCOME / इतर जमा** | | |
| 162.00 | 1. DIVIDEND / लाभांश | 1,000.00 | |
| 1,62,76,904.90 | 2. SERVICE CHARGES / सेवा शुल्क | 3,09,07,744.05 | |
| 64,86,915.78 | 3. RECOVERY CHARGES / वसुली शुल्क | 37,99,924.95 | |
| 7,92,151.62 | 4. BANK CHARGES / बँक शुल्क | 9,08,700.74 | |
| 53,735.00 | 5. TENDER FEE / निविदा शुल्क | 1,00,515.00 | |
| 27,700.00 | 6. LOCKER RENT RECD. / लॉकर भाडे | 37,700.00 | |
| 10,48,555.75 | 7. STATIONARY CHARGES / स्टेशनरी चार्जेस | 9,67,059.94 | |
| 19,80,122.00 | 8. CHARGES FOR CIBIL REPORT / सिबील रिपोर्ट चार्जेस | 28,00,945.00 | |
| 0.00 | 9. PROFIT ON SALE OF ASSET / मालमत्ता विक्रीतून झालेला नफा | 86,591.00 | |
| 0.00 | 10. WRITTEN OF ASSEST DEPRICIATION / घसारा निर्लेखित | 4,753.00 | 3,96,14,933.68 |
| | **COMMISSION / कमिशन जमा** | | |
| 1,20,880.50 | 1. MSEDCL / एम.एस.ई.डी.सी.एल. | 1,57,337.60 | |
| 5,673.14 | 2. BBPS / बी.बी.पी.एस | 5,032.76 | |
| 8,265.51 | 3. MINI ATM / मिनी ए.टी.एम | 2,613.80 | |
| 20,37,722.79 | 4. INSURANCE / विमा | 29,04,235.05 | 30,69,219.21 |
| 246,62,58,469.33 | BALACE C/F / पुढील पानावर ..... | | 236,57,08,400.74 |

## दि. ३१ मार्च २०२२ अखेरचे

| 31-03-2021 ₹ पै. | EXPENDITURE / खर्च | ₹ पै. | 31-03-2022 ₹ पै. |
|---|---|---|---|
| 188,00,41,746.63 | **BALANCE B/F / मागील पानावरून** | | 198,59,71,553.72 |
| 3,20,895.00 | 11. INT.ON.EMP.HELP FUND / कर्मचारी सहाय्यता निधी व्याज | 3,86,691.00 | |
| 5,58,890.80 | 12. MEDICAL EXPENSES / वैद्यकीय खर्च | 56,685.14 | |
| 91,500.00 | 13. LEGAL FEE / कायदेविषयक फी | 5,35,000.00 | |
| 1,12,930.22 | 14. STORAGE EXPS. / स्टोरेज खर्च | 1,16,823.84 | |
| 66,69,108.96 | 15. EXP. ON I.T. SERVICES / माहिती तंत्रज्ञानावरील खर्च | 1,02,99,183.01 | |
| 57,00,759.79 | 16. GST / वस्तु व सेवा कर | 78,78,600.58 | |
| 10,59,611.00 | 17. INCOME TAX / आयकर खाते | 68,73,381.00 | |
| 26,46,672.18 | 18. OFFICE RENOVATION EXP. W/OFF / कार्यालयीन सजावट खर्च निर्लेखित | 24,56,419.27 | |
| 3,00,000.00 | 19. SECURITY CHARGES OF PROPERTY / सुरक्षा रक्षक चार्जेस | 3,13,548.00 | |
| 0.00 | 20. UNIFORM / गणवेष | 16,69,428.76 | |
| 0.00 | 21. GOVT SECURITY CHARGES / शासकीय रोखे खरेदी वि.चार्जेस | 1,77,026.00 | |
| 0.00 | 22. INT PAID ON INCOME TAX / आयकर व्याज खाते | 42,788.00 | |
| 0.00 | 23. RECRUITMENT EXPENSE / भरती खर्च | 3,94,203.24 | 7,01,20,438.49 |
| | **MEETING EXPANSES / सभा खर्च** | | |
| 2,24,101.00 | 1. DIR.MTG.ALLOWANCES / संचालक सभा भत्ता | 9,12,624.00 | |
| 31,164.06 | 2. A.G.M. EXPENSES / वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | 0.00 | 9,12,624.00 |
| | **PROVISION FOR EXPENSES / खर्च तरतूदी** | | |
| 15,00,000.00 | 1. AGM EXPENSES / वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च तरतूद | 13,63,949.16 | |
| 30,08,000.00 | 2. AUDIT FEE EXPENSES / ऑडिट फी तरतूद खर्च | 29,96,500.00 | 43,60,449.16 |
| 3,85,01,219.69 | **DEPRECIATION / घसारा** | | 4,99,50,168.64 |
| | **PROVISION UNDER MCS ACT 1960 U/S 65 / महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ६५ खालील तरतूदी** | | |
| 15,45,00,000.00 | 1. EXPENSES FOR BAD & DEBT. / बुडीत व संशयित कर्ज | 4,50,00,000.00 | |
| 75,00,000.00 | 2. PRO EXPS. FOR OVDU. INT RESER. / थकीत व्याज तरतूद | 50,00,000.00 | |
| 10,25,00,000.00 | 3. PRO. FOR INVEST.DEP.EXP. / गुंतवणूक घसारा तरतूद | 0.00 | 5,00,00,000.00 |
| 26,09,91,870.00 | **NET PROFIT TRANSFER TO B/S निव्वळ नफा ताळेबंद पत्रकास वर्ग** | | 20,43,93,166.73 |
| 246,62,58,469.33 | **TOTAL / एकूण** | | 236,57,08,400.74 |

सदर तारखेच्या दिलेल्या स्वतंत्र अहवालाप्रमाणे

ठिकाण : मुंबई
दिनांक : ५ ऑगस्ट २०२२

**मे. आर. आर. पिंगळे**
मेंबरशीप क्र. १०३८११, FRN -117610W
वैधानिक लेखापरिक्षक

**मे.पोंक्षे कुलकर्णी ॲण्ड कंपनी**
सी.ए. गौरव लवाटे
भागीदार (स.न.२११२५६) FRN -107962W
अंतर्गत हिशोब तपासणीस

## नफा-तोटा पत्रक

| 31-03-2021 ₹ पै. | INCOME / उत्पन्न | ₹ पै. | 31-03-2022 ₹ पै. |
|---|---|---|---|
| 246,62,58,469.33 | BALANCE B/F / मागील पानावरून | | 236,57,08,400.74 |
| 246,62,58,469.33 | TOTAL / एकूण | | 236,57,08,400.74 |

शिवकृपा सहकारी पतपेढी लि., मुंबई करीता

श्री. चंद्रकांत ह. शेळके
मुख्य कार्यकारी अधिकारी
तथा कार्यलक्षी संचालक

श्री. वसंत खा. चव्हाण
उपाध्यक्ष

श्री. कृष्णा तु. शेलार
संस्थापक व अध्यक्ष

## दि. ३१ मार्च २०२२ रोजीचे

| 31-03-2021 ₹ पै. | CAPITAL & LIABILITIES / भांडवल व देणी | | 31-03-2022 ₹ पै. |
|---|---|---|---|
| | **SHARE CAPITAL / भाग भांडवल** | | |
| 250,00,00,000.00 | **AUTHORISED SHARE CAPITAL / अधिकृत भाग भांडवल** | | 250,00,00,000.00 |
| 133,71,87,400.00 | **PAID UP SHARE CAPITAL / वसुल भाग भांडवल** | | 138,08,86,200.00 |
| | **RESERVE FUND & OTHER RESERVES / राखीव निधी व इतर निधी** | | |
| 46,69,55,870.24 | 1. RESERVE FUND / राखीव निधी | 53,32,34,360.24 | |
| 69,92,48,059.96 | 2. BUILDING FUND / इमारत निधी | 76,32,15,912.96 | |
| 62,19,74,917.62 | 3. RES. FOR B.&D. FUL DEBTS / बुडीत व संशयित कर्ज निधी | 62,87,05,365.07 | |
| 10,82,66,065.48 | 4. ADDITIONAL R.B.D.D / अतिरीक्त बुडीत व संश.कर्ज निधी | 10,82,66,065.48 | |
| 1,15,000.00 | 5. RES. R.B.D.D INVESTMENT / बुडीत व संश.निधी-गुंतवणूक | 1,15,000.00 | |
| 1,75,67,335.00 | 6. DIV. EQUALISATION FUND / लाभांश समतोल निधी | 1,95,67,335.00 | |
| 6,00,000.00 | 7. CHARITABLE FUND / धर्मादाय निधी | 6,00,000.00 | |
| 62,28,434.00 | 8. EMPLOYEES WELFARE FUND / कर्मचारी कल्याण निधी | 66,76,582.00 | |
| 1,33,50,850.00 | 9. CO.-OP. EDUCATION FUND / सहकार प्रशिक्षण निधी | 1,45,50,850.00 | |
| 97,05,122.32 | 10. SOCIAL WELFARE FUND / समाजकल्याण निधी | 1,05,70,122.32 | |
| 24,02,90,765.00 | 11. CONTINGENCY FUND / आपत्कालीन निधी | 23,51,05,550.00 | |
| 64,86,109.00 | 12. ELECTION FUND / निवडणूक निधी | 64,86,109.00 | |
| 44,76,509.00 | 13. EMP. HELP FUND / कर्मचारी सहाय्यता निधी | 52,55,200.00 | |
| 10,13,62,982.00 | 14. RES. FOR STANDARD ASSETS / उत्पादित कर्ज निधी | 10,13,62,982.00 | |
| 42,32,568.00 | 15. GOLDEN JUBILEE CELE.FUND / सुवर्णमहोत्सव निधी | 47,32,568.00 | |
| 5,00,00,000.00 | 16. INFORMATION TECH. FUND / माहिती तंत्रज्ञान निधी | 5,10,00,000.00 | |
| 11,33,68,832.33 | 17. GENERAL RESERVE FUND / जनरल रिर्झव्ह निधी | 11,33,68,832.33 | |
| 2,78,58,340.00 | 18. RES. FOR OVERDUE INT / थकीत व्याज निधी | 2,87,86,460.00 | |
| 16,00,00,000.00 | 19. INVESTMENT. DEP.FUND / गुंतवणूक घसारा निधी | 16,00,00,000.00 | |
| 20,98,538.00 | 20. BUS. EXPANSION FUND / व्यवसाय वाढ निधी | 19,09,578.00 | |
| 0.00 | 21. NPA LOAN EXP. CHARGES / एन.पी.ए.कर्ज खर्च तरतूद | 3,24,23,036.47 | |
| 0.00 | 22. NPA A/C INT / एन.पी.ए.व्याज तरतूद खाते | 2,08,46,516.08 | 284,67,78,424.95 |
| | **DEPOSITS / ठेवी** | | |
| 169,64,64,908.53 | 1. SAVING DEPOSIT / बचत ठेव | 182,27,67,860.16 | |
| 86,539.00 | 2. MY SAVING DEPOSIT/ माझी बचत ठेव | 86,539.00 | |
| 221,18,12,281.40 | 3. DAILY DEPOSIT / दैनंदिन ठेव | 240,69,25,086.40 | |
| 16,94,55,952.00 | 4. RECURRING DEPOSIT / आवर्त ठेव | 17,16,67,592.00 | |
| 1,48,25,126.00 | 5. SHIVSAGAR DEPOSIT / शिवसागर ठेव | 1,55,76,434.00 | |
| 17,64,89,409.00 | 6. SHIVAMRUT LAKSHADHISH DEPOSIT / शिवांमृत लक्षाधिश ठेव | 19,75,63,457.00 | |
| 538,66,61,084.00 | 7. FIXED DEPOSIT / मुदत ठेव | 583,42,47,512.00 | |
| 151,75,68,747.00 | 8. MONTHLY INCOME DEPOSIT / मासिक प्राप्ती ठेव | 179,93,70,146.00 | |
| 41,42,04,451.00 | 9. DOUBLE BENEFIT DEPOSIT / दामदुप्पट ठेव | 44,42,52,271.00 | |
| 18,88,12,143.00 | 10. SECURITY DEPOSIT / सुरक्षित ठेव | 21,00,89,865.00 | |
| 435,76,25,189.00 | 11. SHIVSAMRUDHI DEPOSIT / शिवसमृध्दी ठेव | 519,05,83,686.00 | |
| 33,96,32,999.00 | 12. SHIVLAXMI DEPOSIT / शिवलक्ष्मी ठेव | 48,99,850.00 | |
| 2046,50,12,526.88 | **BALACE C/F / पुढील पानावर .....** | | 422,76,64,624.95 |

## ताळेबंद पत्रक

| 31-03-2021 ₹ पै. | PROPERTY & ASSETS / मालमत्ता व येणी | ₹ पै. | 31-03-2022 ₹ पै. |
|---|---|---|---|
| | **CASH & BANK BALANCE / रोख व बँक शिल्लक** | | |
| 2,84,28,944.00 | 1. CASH IN HAND / रोख शिल्लक | 3,17,75,147.00 | |
| 14,82,50,091.41 | 2. CASH AT BANK / बँक शिल्लक | 17,57,90,884.58 | 20,75,66,031.58 |
| | **INVESTMENTS / गुंतवणूक** | | |
| | **1. BANK INVESTMENTS / बँक गुंतवणूक** | | |
| | **A. INVESTMENT FOR RES.FUND / राखीव निधी पोटी गुंतवणूक** | | |
| 1,88,28,530.00 | 1. MDCC BANK / मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. | 1,89,54,330.00 | |
| 7,30,84,697.00 | 2. M.S.C. BANK / दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक | 11,63,25,145.00 | |
| 36,77,43,020.00 | 3. SATARA D.C.C BANK / सातारा जिल्हा मध्यवर्ती सह.बँक | 39,01,47,710.78 | |
| 1,16,62,574.00 | 4. RAIGAD D.C.C BANK / रायगड जिल्हा मध्यवर्ती सह.बँक | 1,24,15,703.00 | 53,78,42,888.78 |
| | **B. INVESTMENTS FOR LIQUIDITY / तरलते पोटी गुंतवणूक** | | |
| 1,90,00,000.00 | 1. STATE BANK OF INDIA / भारतीय स्टेट बँक | 27,99,02,981.00 | |
| 3,24,59,104.00 | 2. MDCC BANK / मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | 3,25,82,160.00 | |
| 5,20,59,173.00 | 3. SATARA D.C.C BANK / सातारा जिल्हा मध्यवर्ती सह. बँक | 18,51,83,329.00 | |
| 60,08,63,185.00 | 4. SARASWAT CO.OP BANK / सारस्वत को-ऑप बँक | 87,72,56,327.00 | |
| 59,20,13,427.00 | 5. TJSB SAH. BANK / टी.जे.एस.बी सह. बँक | 95,97,24,283.00 | |
| 61,10,22,692.00 | 6. SVC CO-OP. BANK / एस.व्ही.सी. को-ऑप. बँक | 85,43,31,230.00 | |
| 37,34,77,110.00 | 7. BHARAT CO-OP BANK LTD. (MUMBAI) / भारत को-ऑप.बँक (मुंबई) लि., | 37,95,62,228.00 | |
| 22,80,23,297.00 | 8. N.K.G.S.B. CO.OP BANK / एन.के.जी.एस.बी को-ऑप.बँक | 28,03,23,440.00 | |
| 57,30,61,857.00 | 9. JANATA SAHAKARI BANK / जनता सहकारी बँक, पुणे | 43,18,06,000.00 | |
| 79,85,49,071.00 | 10. PMC BANK (UNITY BANK) / पीएमसी (युनिटी बँक स्मॉल फायनान्स) | 80,12,70,204.00 | |
| 40,88,41,865.00 | 11. APNA SAH. BANK / अपना सहकारी बँक | 20,99,98,468.00 | |
| 18,76,16,457.00 | 12. THE KARAD URBAN CO-OP. BANK / दि कराड अर्बन को-ऑप बँक | 12,28,16,457.00 | |
| 9,06,59,919.00 | 13. KALYAN JANATA SAH. BANK / कल्याण जनता सह. बँक | 14,50,000.00 | |
| 23,70,88,982.00 | 14. JANASEVA SAH. BANK / जनसेवा सह.बँक पुणे | 23,70,88,982.00 | |
| 62,28,81,023.00 | 15. GP PARSIK SAH.BANK / जी.पी.पारसिक सह.बँक | 61,49,36,775.00 | |
| 6,14,06,890.00 | 16. THANE BHARAT SAH. BANK / ठाणे भारत सहकारी बँक | 6,64,06,890.00 | |
| 56,41,72,727.00 | 17. MUNICIPAL CO-OP BANK / म्युनिसिपल को-ऑप बँक मुंबई | 53,69,80,479.00 | |
| 2,49,96,747.00 | 18. DMK JAOLI SAHKARI BANK / डीएमके जावली सह बँक | 1,25,00,000.00 | |
| 1,52,87,964.00 | 19. HINDUSTHAN CO.OP. BANK / हिंदुस्थान को-ऑप. बँक | 1,56,50,118.00 | |
